चैतन्य हॉस्पिटल (डॉ. जठार)

ताजणे मळा, डॉ. नागरे हॉस्पिटल समोर, नवीन नगर रोड, संगमनेर

डॉ. नितीन जठार

एम.बी.बी.एस., डी.टी.सी.डी.
कन्सल्टंट फिजिशियन
तज्ज्ञ : छातीचे हृदय रोग
टी.बी. व दम्याचे विकार

डॉ.सौ. उज्ज्वला जठार

एम.बी.बी.एस., डी.सी.एच.
कन्सल्टंट पेड्रियाट्रिशियन
तज्ज्ञ : बालरोग, नवजात
अर्भक प्रिमॅच्युअर बेबी केअर

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता



अत्याधुनिक कॅथ लॅब (Cath Lab)

२१ व्या वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

उपलब्ध सुविधा

- अतिदक्षता विभाग
- मधुमेह व हृदय रोग
- सर्पदंश व विषबाधा
- मेंदु विकार व शस्त्रक्रिया
- दमा व श्वसनाचे तसेच फुफ्फुसासंबंधी औषधोपचार
- जनरल सर्जरी
- किडनी विकार
- बालरोग चिकित्सा विभाग
- संधीवात व मणके विकार
- प्लास्टिक सर्जरी व व्यंगोपचार
- आपातकालीन औषधे व उपचार
- पोटाचे विकार व शस्त्रक्रिया

सर्जरी विभाग

- पोटाच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया
- दुर्बिणद्वारे पोटाच्या व मोठ्या आतडीच्या होणाऱ्या शस्त्रक्रिया
- मुळव्याध, भगंदर व फिशरच्या होणाऱ्या सर्व शस्त्रक्रिया
- न भरणाऱ्या जखमावरील उपचार
- शरीरावरील सर्व प्रकारच्या गाठींवरील उपचार व शस्त्रक्रिया
- मानेच्या व स्तनांच्या गाठींवरील उपचार व शस्त्रक्रिया
- लहान मुलांच्या शस्त्रक्रिया



मुख्यमंत्री वैद्यकिय सहाय्यता निधी सुविधा उपलब्ध





उपलब्ध निदान सुविधा

- सी. टी. स्कॅन
- डायलिसीस
- डिजीटल एक्स-रे
- सोनोग्राफी
- २-डी इको
- पॅथॉलॉजी लॅब

हृदय विभाग उपलब्ध सुविधा

- कन्सल्टेशन
- ईसीजी
- 2 डी इकोकार्डिओग्राफी
- बलून वॉल्वोटॉमी
- अँजिओग्राफी
- अँजिओप्लास्टी
- पेसमेकर
- डिव्हाईस क्लोजर
- स्ट्रेस टेस्ट
- होल्टर मॉनिटरींग
- आय व्ही सी फिल्टर
- अँब्युलेटरी बी.पी. मॉनिटरींग

भव्य रक्तदान शिबीर

शुक्रवार, 16 ऑक्टोबर 2026, सकाळी 9 ते 5
संपर्क - 9922158084, 7038170382

24×7 आपत्कालीन हृदयरोग सेवा उपलब्ध



२४ तास अत्यावश्यक सेवा

- मेडीकल स्टोअर्स
- रुग्णवाहिका
- रक्तपेढी
- स्ट्रेचर लिफ्ट सुविधा

सर्व प्रकारच्या कॅशलेस कंपनी सुविधा उपलब्ध

अद्ययावत पॅथेलॉजी,
होम ब्लड कलेक्शन सुविधा,
अद्ययावत सी. टी. स्कॅन मशीन

आयुष्मान भारत योजना / महात्मा ज्योतिबा फुले योजना | मोफत केले जाणारे उपचार (हृदयरोग, बालरोग, मूत्रसंस्था संबंधीत आजार, कॅन्सर)

२४ तास सुविधांसाठी ☎ 02425 - 224761 7038170382

धर्माच्या नावावर मागे नेणारे विचार नकोत देश विज्ञानवादी हवा! - माजी मंत्री थोरात

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सध्या देशामध्ये धार्मिक आणि जातीपातीचे राजकारण सुरू आहे. जे तरुण पिढीला अजिबात मान्य नाही. या तरुणांना प्रगतशील व विज्ञानाचा देश हवा आहे. संतांचा समाज सुधारकांचा मानवतेचा मंत्र हवा आहे. मात्र काही राजकीय लोक तरुण पिढीला धर्माच्या नावावर पुन्हा मागे नेण्याचा प्रयत्न करत असून जेन-झी ही संत कबीरांच्या मानवतेच्या विचारांची असल्याचे प्रतिपादन मा. महसूल व शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले असून अमृतवाहिनीत झालेल्या कबीर वाणीला तरुणाईचा उदंड प्रतिसाद मिळाला.



अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालय येथे डॉ. जयश्रीताई थोरात यांच्या संकल्पनेतून कबीर कॅफे हा कबीर वाणीचा संगीतमय कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी सौ. कांचनताई थोरात, दुर्गाताई तांबे, रामहरी कातोरे, कार्यकारी विश्वस्त शरयूताई देशमुख, डॉ. जयश्रीताई थोरात, व्यवस्थापक प्रा. व्ही बी धुमाळ, प्राचार्य डॉ. प्रसाद बाविस्कर, डॉ. बी. एम लोंढे, प्रा. जी.बी काळे, डॉ. मच्छिंद्र चव्हाण, प्रा विजय वाघे ,नामदेव गायकवाड, विलास भाटे यांच्यासह सर्व विभागांचे प्राचार्य उपस्थित होते.

या संत कबीरवाणी संगीतमय कार्यक्रमात ह.भ.प. विनोद राऊत, निलेश गायकवाड, प्रा. नानासाहेब गुंजाळ, कबीर भजन गायिका शरयू झंवर, जानवी झंवर, ईशा लिमये, रिया पितळे, प्रथमेश बिडवे, प्रताप राऊत, अवधूत काळे, विशाल पाटील यांनी सहभाग घेऊन सुंदर कबीर वाणी सादर केली. यामध्ये सुरुवातीला विनोद राऊत यांनी कबीर कहे कमाल को, दो बाणा सिख लो,कर साहिब की बंदगी भुके को अन्न दे हे गीत सादर केले तर आदत बुरी सुधारलो बस हो गया भजन यामध्ये सर्व मंत्रमुग्ध झाले.

जानवीच्या आवाजातील कहे गये कबीर धीरे धीरे मना रे या गीताने प्रत्येकाला ठेका धरायला लावला. तर जरा धीरे धीरे गाडी हा को मेरे राम गाडीवाले या गीताला टाळ्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला.

जब हम पैदा हुए, हम रोये, जग हसे, ऐसी करनी कर चले, हम हसे ,जग रोये या गीताने प्रत्येकाच्या काळजाचा ठोका चुकविला. यावेळी बोलताना माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, संत कबीरांचा विचार हा मानवतेचा आणि प्रेमाचा विचार आहे. माणसांवर आणि गरिबांवर प्रेम करा, पशुपक्ष्यांवर दया करा, भेदभाव करू नका हा संदेश त्यांनी दिला आहे. मानवधर्म हा विचार श्रेष्ठ असून तो कायम श्रेष्ठ राहणार आहे. कबीर कॅफे या मधून मानवतेचा विचार पुढे नेण्यासाठी चांगले काम होत आहे. सध्याच्या तरुण पिढीला प्रगतशील आणि विज्ञानवादी देश हवा आहे. मात्र राजकारणी लोक जातीपातीचे राजकारण करत आहेत भेदभाव करत आहेत. हे या झेनजीला मान्य नाही. त्यांना देशाला विज्ञानातून पुढे नेणारे विचार हवे आहेत. धार्मिकतेच्या नावावर मागे अनेक नेणारे नको.संत कबीरांचा मानवतेचा विचार हवा असून तो सर्वांनी पुढे घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. तर डॉ.जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, संत कबीर यांनी सुमारे पाचशे वर्षांपूर्वी सांगितलेला मानवतेचा आणि समतेचा विचार हा आजच्या काळात सुद्धा अत्यंत महत्त्वाचा आहे. लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी हा विचार कायम जोपासला असून माणुसकी आणि मानवता धर्म वाढवण्यासाठी कबीर वाणी हा उपक्रम आयोजित करण्यात आले असल्याचे ते म्हणाल्या.

दुष्काळात पशुधन वाचविण्यासाठी ऊसाचा चारा करा - गणेश श्रीराम

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीत जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांचे ऊस प्लॉट चारा छावण्यांसाठी आरक्षित करून त्यातून उपलब्ध होणारा चारा स्थानिक जनावरांना पुरवावा, अशी महत्त्वपूर्ण सूचना डिग्रस येथील जागरूक शेतकरी गणेश श्रीराम यांनी केली आहे.



दुष्काळात पिण्याच्या पाण्याप्रमाणेच जनावरांच्या चाऱ्याचेही नियोजन करणे आवश्यक आहे. संगमनेर तालुक्यातील ऊस क्षेत्राचा चारा स्रोत म्हणून उपयोग केल्यास चारा छावण्यांसाठी स्थानिक पातळीवर चारा उपलब्ध होऊ शकतो. त्यामुळे चाऱ्याअभावी अडचणीत येणाऱ्या पशुपालक शेतकऱ्यांना दिलासा मिळेल, असे श्रीराम यांनी सांगितले.

मात्र, ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताचाही विचार होणे गरजेचे आहे. चारा छावण्यांसाठी ऊस उपलब्ध करून देणाऱ्या शेतकऱ्यांना एफआरपीप्रमाणे योग्य मोबदला देण्याची व्यवस्था शासनाने करावी, अशी मागणी त्यांनी केली.

शासनाने ऊस उत्पादक शेतकरी आणि चारा छावणी व्यवस्थापन यांच्यात समन्वय साधून ठोस निर्णय घ्यावा. योग्य मोबदला मिळाल्यास शेतकरीही या उपक्रमाला सहकार्य करतील. दुष्काळात पशुधनाचे संरक्षण करण्यासाठी चाऱ्याचे नियोजन आणि वितरण प्रभावीपणे करणे आवश्यक आहे, असे गणेश श्रीराम यांनी नमूद केले.

न्यायालयाची निनडणूक आयोगाला नोटीस

नवी दिल्ली - मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कथित घोटाळ्याच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या याचिकेवरून सर्वोच्च न्यायालयाने ज्ञानेश कुमार यांच्यासह दोन्ही निवडणूक आयुक्तांना नोटीस बजावली आहे. या प्रकरणात स्पष्टीकरण देण्याचे आदेश कोर्टाने दिले आहेत. तसेच कोर्टाच्या बाहेर केलेल्या आंदोलनावरून सर्वोच्च न्यायालयाने राहुल गांधी यांनाही फटकारलं आहे. कोर्टाला अशा पद्धतीने कोणी धमकावू शकत नाही, अशा शब्दात कोर्टाने राहुल गांधी यांना फटकारलं आहे. कोर्टाने आज नोटिसांचा धडकाच सुरू केला आहे. निवडणूक आयोगासह दिल्ली पोलीस आणि केंद्र सरकारलाही कोर्टाने नोटीस बजावली आहे.सर्वोच्च न्यायालयाने राहुल गांधी यांच्या याचिकेची दखल घेतली आहे. या याचिकेवरून कोर्टाने मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि इतर दोन्ही निवडणूक आयुक्तांना नोटीस बजावली आहे. राहुल गांधींच्या कोर्टातील वर्तणुकीवरही कोर्टाने स्पष्टीकरण मागितलं आहे. सुप्रीम कोर्टाच्या परिसरात समर्थकांसोबत राहुल गांधी गेले होते त्यावर स्पष्टीकरण द्या, अशा सूचना कोर्टाने दिल्या आहेत. कोर्टाला कोणीही धमकावू शकत नाही, असं कोर्टाने म्हटलं आहे.यावेळी कोर्टाने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सरकारची बाजू मांडली. सरकारने आपल्या निर्णयाचा खुलासा केला असून त्याचं कारण शपथपत्रात दिलं आहे.

नूतन आर्ट्स कॉलेज, राजापूर येथे वाचन प्रेरणा दिन उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

राजापूर - नूतन आर्ट्स कॉलेज, राजापूर येथे भारताचे माजी राष्ट्रपती व थोर शास्त्रज्ञ डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. डी. वरपे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. आर. एल. गोफने सरयांनी केले. यावेळी प्रा. डॉ. आहेर सर यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व, वाचन संस्कृती आणि व्यक्तिमत्त्व विकास यांविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील ग्रंथपाल प्रा. थिटे सर उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना नियमित वाचनाचे महत्त्व समजावून सांगितले. वाचनामुळे ज्ञानात भर पडते, विचारशक्ती विकसित होते आणि भाषिक कौशल्यांचा विकास होतो, असे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमातील पुस्तकांसोबतच अवांतर पुस्तके, चरित्रे, वर्तमानपत्रे आणि विविध साहित्यप्रकारांचे नियमित वाचन करावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा थोरात सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. प्रतीक्षा खतोडे मॅडम यांनी केले. महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे आणि वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

एमपीएससीची जुनी कागदपत्रे नष्ट करू नका
रोहित पवारांचा आयोगाला इशारा

मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील कथित प्रश्नपत्रिका फुटी आणि गैरप्रकारांविरोधात विद्यार्थ्यांसोबत सलग अकरा दिवस आंदोलन करणारे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी आयोगाला पुन्हा एकदा इशारा दिला आहे. 'आंदोलन स्थगित केले म्हणजे प्रकरण संपले, अशा भ्रमात कुणीही राहू नये,' असे स्पष्ट करत त्यांनी आयोगाच्या जुन्या कागदपत्रांची विल्हेवाट लावण्याच्या निर्णयावर तीव्र आक्षेप घेतला आहे.



समाजमाध्यमांवर सविस्तर पोस्ट प्रसिद्ध करत रोहित पवार यांनी आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले, महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील महाभागांनी जास्त हुशारी करण्याचा प्रयत्न करू नये. आमचे आंदोलन स्थगित झाले असले, तरी आयोगाच्या प्रत्येक हालचालीवर आमचे बारकाईने लक्ष आहे. प्रश्नपत्रिका फोडून लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याचे नुकसान करणाऱ्या एकाही दोषीला आम्ही सोडणार नाही. योग्य चौकशी होऊ द्या, प्रश्नपत्रिका फोडणारे सर्वजण घरी जातील.

सध्या आयोगाकडून जुनी कागदपत्रे रद्दीत काढून नष्ट करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचा आरोप रोहित पवार यांनी केला आहे. या प्रक्रियेतील घाईवर संशय व्यक्त करत त्यांनी विचारले, आयोगाला अचानक जुनी कागदपत्रे नष्ट करण्याची एवढी घाई का झाली आहे? हा प्रकार कशासाठी? सध्या सुरू असलेल्या न्यायिक चौकशीचा आणि समितीत असलेल्या तुकाराम मुंढे यांच्या धाकाचा हा परिणाम आहे का?

आयोगाचे संपूर्ण शुद्धीकरण करायचे असेल, तर जुन्या कागदपत्रांची तपासणी करणे अत्यंत आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले. त्यामुळे चौकशी पूर्ण होईपर्यंत कागदपत्रे नष्ट करण्याच्या निर्णयाला तातडीने स्थगिती द्यावी, अशी मागणी त्यांनी सरकार आणि आयोगाच्या सचिवांकडे केली आहे.

MPSC मधील या सर्व प्रकरणाच्या चौकशीसाठी नेमण्यात आलेल्या समितीत सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांचा समावेश आहे. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर MPSC चे आयुक्त भीमनवार हे रजेवर गेले आहेत. सुरुवातीला त्यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आल्याची चर्चा होती. मात्र, त्यांनी स्वतः पोस्ट शेअर करत यावर स्पष्टीकरण दिले आहे. जोपर्यंत या प्रकरणाची चौकशी पूर्ण होत नाही, तोपर्यंत आपण स्वतःहून रजेवर जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

महाराष्ट्र शासन
सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग
उपनिबंधक, सहकारी संस्था, संगमनेर
यांचे कार्यालय, यशवंतराव चव्हाण प्रशासकीय भवन, ३ रा मजला,
Email - dr_sangmner@rediffmail.com नवीन नगर रोड, संगमनेर, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर

जा.क्र वि-१/अमृतवाहिनी बँक/जाहिर समन्स/कलम १०१/सन २०२६ दिनांक /१०/२०२६

-: जाहीर समन्स नोटीस :-

ज्याअर्थी वादी सहकार महर्षि भाऊसाहेब थोरात अमृतवाहीनी सहकारी बँक लि. घुलेवाडी, संगमनेर ता. संगमनेर जि. अहिल्यानगर यांनी प्रतीवादी यांचे विरुध्द या कार्यालयात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये प्रमाणपत्र मिळणे कामी दिनांक १८/०९/२०२६ रोजी दावा दाखल करुन वसुली प्रमाणपत्राची मागणी केली आहे. त्यावर दिनांक १६/०९/२०२६ रोजी नोटीस बजावण्यात येऊन दिनांक ०६/१०/२०२६ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. परंतु काही इसम सुनावणीस उपस्थित राहीलेले नाही.

त्याअर्थी खाली नमुद प्रतिवादी यांना नैसर्गिक न्यायतत्वाच्या दृष्टीने नोटीस देण्यात येते की, आपण वार बुधवार दिनांक २१/१०/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता उपनिबंधक, सहकारी संस्था, संगमनेर, यशवंतराव चव्हाण प्रशाकिय भवन, तिसरा मजला, नविन नगर रोड, संगमनेर या कार्यालयात सदर दाव्यामध्ये लेखी तोंडी म्हणणे देणे कामी हजर राहावे. सदर दिवसी व वेळेत आपण हजर न राहील्यास अथवा लेखी म्हणणे आपण सादर न केल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

अ. क्र.	दावा क्रमांक	प्रतीवादी (कर्जदार व जामिनदार)	दावा रक्कम
०१	१६७/२०२६	१. कर्जदारः देशमुख बाळासाहेब भास्करराव मु. पो. पिंपरणे, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर २. जामिनदारः राजकुवर नानासाहेब देशमुख मु.पो. पिंपरणे. ता. संगमनेर जि. अहिल्यानगर ३. जामिनदारः तुषार रावसाहेब देशमुख, मु.पो. पिपरणे. ता. संगमनेर जि. अहिल्यानगर ४. जामिनदारः सतिष गणपत कोटकर,मु.पो. कोटकर वस्ती, आंभोरे, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर	१५,४८,७८५/-
०२	१६८/२०२६	१. कर्जदारः जालिंदर नामदेव पारधी, मु.पो. पारधी नर्सरी सायखिंडी. ता. संगमनेर जि. अहिल्यानगर २. जामिनदारः नामदेव चांगदेव पारधी, मु.पो. सायखिंडी. ता. संगमनेर जि. अहिल्यानगर ३. जामिनदारः सखाहरी रानबा गुळवे, मु. नखुली बस्ती, जुनेगांव, पो. तळेगांव दिघे ता. संगमनेर जि ३. जामिनदारः सखाराम चांगदेव पारधी, मु.पो. सायखिंडी. ता. संगमनेर जि. अहिल्यानगर	१०,२२,६४४-
०३	१६९/२०२६	१. कर्जदारः दिघे गोरक्षनाथ सुर्यभान, रा. लोणी रोड, जुनेगांव, तळेगांव दिघे, ता. संगमनेर २. जामिनदारः मुळे भाऊसाहेब बाळकृष्ण, मु. काकड वस्ती, पो. नान्नज दुमाला, ता. संगमनेर जि. अ. नगर ३. जामिनदारः कांदळकर अनिल रामचंद्र मु.पो. धनगरवाडा, तळेगांव दिघे, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर	१,९२,१०३/-
०४	१७०/२०२६	१. कर्जदारः कॉलिटी फ्रुट कं. के. प्रो. प्रा. श्री. गोपीनाथ सोपान सोनवणे मु. पो. वेल्हाळे, ता. संगमनेर जि. अ. नगर २. जामिनदारः देविदास देवराम गुंजाळ, रा. वेल्हाळे रोड, गुंजाळवाडी, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर ३. जामिनदारः अप्पासाहेब सूर्यभान गुंजाळ, मु.पो. महादेव मळा गुंजाळवाडी, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर ४. जामिनदारः शिवाजी सोपान सोनवणे, मु.पो. नदिचा मळा वेल्हाळे, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर ५. जामिनदारः सोपान महादु सोनवणे, मु.पो. नदिचा मळा वेल्हाळे, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर	८९,३१,८३६/-
०५	१७१/२०२६	१. कर्जदारः कांदळकर बाबासाहेब प्रभाकर, मु.पो. तळेगांव दिघे, ता. संगमनेर जि. अ. नगर २. जामिनदारः दिघे रावसाहेब नानासाहेब, मु.पो. वाळपाटील वाडी, तळेगांव दिघे, ता. संगमनेर जि. अ. नगर ३. जामिनदारः कांदळकर शंकर गमाजी, मु.पो. तळेगांव दिघे, ता. संगमनेर जि, अहिल्यानगर ४. जामिनदारः कांदळकर प्रभाकर संभाजी, मु.पो. तलेगांव दिघे, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर	५१,९८,३५४/-
०६	१७३/२०२६	१. कर्जदारः श्रमसाफल्य कंन्स्ट्रक्शन प्रा.प्रा. सोनवणे हौशीराम रामराव. मु.पो. चिचोली गुरव, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर २. जामिनदारः शिंदे विलास गंगाधर, मु. रहिमपुर, पो. जोर्वे, ता. संगमनेर जि. अ. नगर ३. जामिनदारः सोनबने वेगेश रामराव, मु.पो. चिचोली गुरव, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर ४. जामिनदारः सोनवणे नंदा हौशीराम, मु.पो. चिंचोली गुरव, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर	८७,५२,५६०/-
०७	१७४/२०२६	१. कर्जदारः गायकवाड रविंद्र निवृत्ती मु. पो. वडझरी बु. ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर २. सहकर्जदारः गायकवाड निवृत्ती बाबाजी, मु.पो. वडारी, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर ३. जामिनदारः भोसले संजय कारभारी, मु. मेढवन, पो. कौठे कमळेश्वर, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर ४. जामिनदारः दिये शंकर जिजाबा.. मु.पो. तलेगांव दिघे, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर	२,८६,८४५/-
०८	१७५/२०२६	१. कर्जदारः शेरमाळे ज्योती सखाहारी, मु. पारेगाव खुर्द, पो. नान्नज दुमाला, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर २. जामिनदारः कडनर भाऊसाहेब पाटिलबा, मु.पो. नान्नज दुमाला, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर ३. जामिनदारः शेरमाळे सखाहरी बबन, मु. पो. नान्नज दुमाला, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर ४. जामिनदारः कडनर ज्ञानेश्वर भागवत, मु. पो. नान्नज दुमाला, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर ५. जामिनदारः शेरमाळे पार्वताबाई बबन, मु. पारेगाव, खु. पो. नान्नज दुमाला, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर	२३,४४,१४६/-
०९	१७६/२०२६	१. कर्जदारः खुळे शिवाजी रामकृष्ण, मु.पो. रायतेवाडी फाटा, जुना रोड, संगमनेर, ता. संगमनेर २. जामिनदारः बालोडे रमेश मुरलीधर, मु.पो. बालोडे वस्ती, खांडगांव, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर ३. जामिनदारः मंडलिक अनिल गंगाधर, मु.पो. संगमनेर खुर्द, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर ४. जामिनदारः बलज्योतसिंग किर्पालसिंग पंजाबी, मु.पो. पंजाबी कॉलनी, संगमनेर, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर	२१,११,७०८/-
१०	१७७/२०२६	१. कर्जदारः विजय ऑटो प्रा. प्रा. विजय सुदाम खुळे, मु.पो. कोल्हेवाडी, ता. संगमनेर जि, अहिल्यानगर २. जामिनदारः सुदाम भीमाशंकर खुळे, मु.पो. कोल्हेवाडी, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर ३. जामिनदारः गोविंद मार्तंड दिघे, मु.पो. कोल्हेवाडी, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर ४. वारसदारः ललिता दत्तात्रय कोल्हे, अ.पा.क. आर्यन दत्तात्रय कोल्हे मु.पो. कोल्हेवाडी, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर	२५,५९,७४५/-
११	१७८/२०२६	१. कर्जदारः सह्याद्री हॉट मिक्सिंग प्रा. कडु किरण अरुण, मु.पो. कडुपाटील, वस्ती, सात्रळ सोनगाव ता. राहुरी, जि. अ.नगर २. जामिनदारः गोडसे सोमनाथ पुंजा, मु.पो. पेमगीरी, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर ३. जामिनदारः गुंजाळ सुनील विष्णु, मु.पो. मालदाड रोड, संगमनेर ता. संगमनेर जि. अहिल्यानगर	१,१८,७०,४६०/-
१२	१७९/२०२६	१. कर्जदारः सुशीला भागवत शिंदे, मु. पो. वाघापुर, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर २. जामिनदारः सुखदेव विलास चत्तर, मु. पो. चत्तर मळा, खराडी, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर ३. जामिनदारः भागवत भिकाजी शिंदे, मु.पो. वाघापुर, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर	८,२१,३४७/-
१३	१८०/२०२६	१. कर्जदारः कांदळकर चांगदेव गमाजी, मु. वडझरी बु, पो. तळेगांव, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर २. सहकर्जदारः कांदळकर गमाजी हौशीराम, मु. वडारी बु., पो. तळेगांव, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर ३. जामिनदारः दिघे सुनील नामदेव, मु.पो. तळेगाव दिघे, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर ४. जामिनदारः राऊत नंदु कान्हा, मु.पो. निर्मळ पिंप्री रोड, विरोबा मंदिरजवळ, लोणी खु, ता. राहाता,	८,८७,७५७/-

ही नोटीस आज दिनांक १४/१०/२०२६ रोजी माझे सही व कार्यालयाच्या मुद्रेसह दिली आहे.

(संतोष कोरे)
उपनिबंधक, सहकारी संस्था, संगमनेर

स्त्री: सृष्टीचा कणा, कर्तृत्वाचे आकाश आणि आदिशक्तीचे रूप



एक नाजूक टिचकी मारली की खळखन फुटणारं काचेचं भांडं असाच आहे स्त्रीचा जन्म...

विधात्याने ही सुंदर सृष्टी निर्माण केली, पण या सृष्टीला खरा जीव, रूप आणि सौंदर्य लाभलं ते स्त्रीमुळे! आदिशक्तीचे विविध अवतार आपण नवरात्रीत नऊ दिवस पूजतो, तसेच घराघरांमध्ये आणि समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात अवतरलेली ही स्त्री खऱ्या अर्थाने सृष्टीचे रक्षण आणि संवर्धन करत आहे. आई,पत्नी,भगिनी, सून, मावशी, आत्या, नात, सासू आणि लाडकी मुलगी अशा कितीतरी वेगवेगळ्या भूमिका ती कोणत्याही तक्रारीशिवाय अतिशय चोखपणे बजावत असते.

संघर्षातून फुललेलं कर्तृत्व

समाजात जगत असताना स्त्रीला प्रत्येक पावलावर संघर्ष करावा लागला आहे. कधी कुटुंबाची मते सांभाळताना, तर कधी स्वतःचे अस्तित्व टिकवताना तिला अनेक आक्रमक वावटळी झेलाव्या लागल्या आहेत. परंतु, या सर्व आव्हानांवर मात करत तिने केवळ चूल आणि मूल या चौकटीत स्वतःला मर्यादित न ठेवता संपूर्ण जगावर आपले अधिराज्य गाजवले आहे.

आज विज्ञानापासून ते अंतराळापर्यंत, राजकारणापासून ते उद्योजकतेपर्यंत आणि खेळापासून ते सैन्यापर्यंत-असे एकही क्षेत्र नाही जिथे स्त्री पोहोचलेली नाही. तिने आपल्या कष्टाच्या आणि बुद्धिमत्तेच्या बळावर प्रत्येक ठिकाणी आपला ठसा उमटवला आहे.

स्त्रीचे अथांग रूप आणि ताकद
नभाची ओढ धरून चालली जी धरणी,
प्रत्येक युगात तिने सोसली वणवण सारी.
काचेची मूर्ती ती, पण वज्राची ताकद जिच्यात,
लेवून ममता ती जगतेय प्रेमाच्या वाटेवर सतत!

स्त्री ही जरी वरवर पाहता नाजूक वाटत असली, तरी तिच्या आत अथांग समुद्र सामावलेला असतो. कुटुंबाचा गाडा हाकताना ती कधीही स्वतःच्या वेदना जगासमोर मांडत नाही. तिचे हेच रूप तिला इतरांपेक्षा वेगळे ठरवते.

रात्रंदिवस झिजते ती तेलाच्या दिव्यासारखी,
स्वतः जळून उजळून टाके घराची माती सारी.
तिच्या घामाच्या प्रत्येक थेंबात वसलेलं आहे मोल,
तिच्याविना हे जग म्हणजेच जणू पाण्याविना खोल!

घरातल्या प्रत्येकाच्या सुखासाठी ती स्वतःच्या आनंदाचा त्याग करते. तिच्या या निस्वार्थ कष्टाचे मोल कधीही पैशात किंवा शब्दांत करता येणार नाही. ती घराचा केवळ पाठीचा कणा नसून संपूर्ण घराचा प्राण असते.

कधी लेक होऊन घरभर ती हसते,
कधी सासू होऊन योग्य दिशा ती दावते.
आईच्या रूपात साक्षात परमेश्वर भासतो,
तिच्याविना या संसाराचा कशातच रंग नसतो!

एकाच आयुष्यात अनेक भूमिका पार पाडणे हे स्त्रीचे सगळ्यात मोठे वैशिष्ट्य आहे. ती प्रत्येक नात्याला स्वतःच्या प्रेमाने आणि समजुतीने घट्ट बांधून ठेवते.

चूल आणि मूल सांभळत तिने जिंकले हे जग सारे
अंतराळाच्या पटलावर पसरले आहे तिच्या यशाचे वारे
सलाम या नारीशक्तीला अन् तिच्या कष्टाच्या ध्येयाला,
जिने सन्मानाने उंचावला आहे भारताचा तिरंगा या नभाला!

आज नवरात्रीच्या या मंगल पर्वावर आपण फक्त देवीचीच नाही, तर आपल्या आसपास वावरणाऱ्या प्रत्येक स्त्रीच्या त्यागाला, कष्टाला आणि कर्तृत्वाला मानाचा मुजरा करूया. स्त्री ही केवळ कुटुंबाची नाही, तर संपूर्ण राष्ट्राची ताकद आहे. तिचा सन्मान करणे म्हणजेच या सृष्टीचा आणि मानवतेचा सन्मान करणे होय.



श्रीमती निता शिवाजी सावंत
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, धांदरफळ खुर्द

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

महाराष्ट्र दुष्काळमुक्त होऊ दे

आ. खताळ यांनी सप्तशृंगी मातेच्या चरणी प्रार्थना



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सर्वसामान्य जनतेच्या जीवनात सुख, समृद्धी आणि समाधान नांदावे, प्रत्येकाला आरोग्यसंपन्न जीवन लाभावे, तसेच सध्या महाराष्ट्रावर घोंघावत असलेल्या दुष्काळाच्या संकटाचे सावट लवकरात लवकर दूर होऊन शेतकऱ्यांना दिलासा मिळावा, अशी प्रार्थना आमदार अमोल खताळ यांनी वणी येथील श्री सप्तशृंगी मातेच्या चरणी केली. महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी अर्धपीठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नाशिक जिल्ह्यातील वणी येथील श्री सप्तशृंगी गडावर नवरात्रोत्सवानिमित्त आमदार खताळ यांनी परिवारासह भेट देऊन सप्तशृंगी मातेचे दर्शन घेतले आणि आशीर्वाद घेतले.यावेळी आमदार खताळ म्हणाले की, नवरात्रोत्सव हा शक्ती, भक्ती आणि श्रद्धेचा उत्सव मानला जातो. या उत्सवाच्या काळात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून असंख्य भाविक सप्तशृंगी मातेच्या दर्शनासाठी गडावर येतात. दरवर्षीप्रमाणे यंदाही आपण सप्तशृंगी मातेचे दर्शन घेऊन आशीर्वाद मिळविण्यासाठी आलो आहोत.

सध्या राज्यातील विविध भागांत पावसाअभावी शेतीचे मोठे नुकसान झाले असून, अनेक ठिकाणी पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर बनला आहे. या संकटामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. शेतकऱ्यांना या कठीण परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी बळ मिळावे, दुष्काळाचे संकट दूर व्हावे आणि त्यांना दिलासा मिळावा, अशी प्रार्थना आपण सप्तशृंगी मातेच्या चरणी केल्याचे आमदार खताळ यांनी सांगितले. दरम्यान, सप्तशृंगी देवस्थान ट्रस्टच्या वतीने आमदार अमोल खताळ यांचा सप्तशृंगी मातेची प्रतिमा भेट देऊन सन्मान करण्यात आला.

छबूबाई देवराम सांगळे यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

सोनेवाडी - येथील रहिवासी देवराम रेवबा सांगळे यांच्या पत्नी तसेच टिजीपी ग्रुपचे संचालक तुषार गिते यांच्या आजी छबूबाई देवराम सांगळे (वय ७५ वर्ष) यांचे बुधवार, दि. १४ ऑक्टोबर २०२६ रोजी निधन झाले. त्यांच्या निधनाने सांगळे व गिते कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात शोककळा पसरली आहे.

कै. छबूबाई देवराम सांगळे यांच्या पश्चात पती, मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने कुटुंबीयांनी आपल्या प्रिय व्यक्तीला गमावल्याची भावना व्यक्त होत आहे. हरिभाऊ गिते, मुख्य अभियंता मृदू व जलसंधारण विभाग नाशिक आणि छत्रपती संभाजी नगर यांच्या त्या मामी होत्या. तसेच तुषार गिते, बाळासाहेब गिते, किर्तीकुमार सानप, चेतन आव्हाड यांच्या त्या आजी होत्या.

कै. छबूबाई सांगळे यांच्या पार्थिवावर बुधवारी रात्री सोनेवाडी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी कुटुंबीय, नातेवाईक तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने कै. छबूबाई देवराम सांगळे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

राष्ट्रीय स्तरावरील इन्स्पायर अवॉर्ड मानक प्रदर्शनात शारदा विद्यालयाचा सहभाग



युवावार्ता (प्रतिनिधी)

राहता - रयत शिक्षण संस्थेच्या शारदा विद्या मंदिर, राहाता या विद्यालयातील विद्यार्थी बोठे आकाश रावसाहेब याने १२ व्या राष्ट्रीय स्तरावरील भारत मंडपम, नवी दिल्ली येथे इन्स्पायर अवॉर्ड मानक प्रदर्शनात सहभाग नोंदवून विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. हे प्रदर्शन दि. १२ ते १४ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत भारत मंडपम, नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आले.

या राष्ट्रीय स्तरावरील प्रदर्शनासाठी विद्यार्थ्याला विद्यालयाच्या मार्गदर्शक शिक्षिका व विद्यालयाच्या प्र. पर्यवेक्षिका कमल साबळे यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्याने आपल्या नावीन्यपूर्ण वैज्ञानिक संकल्पनेच्या माध्यमातून राष्ट्रीय स्तरावर विद्यालयाचे तसेच महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व केले.

विद्यालयाच्या या यशाबद्दल विद्यालयाच्या स्थानिक स्कूल कमिटीचे सदस्य रमेश शिंदे पाटील, विद्यालयाच्या प्राचार्या श्रीम. शीला संसारे, जनरल बॉडी सदस्य नानासाहेब मते, सर्व स्थानिक स्कूल कमिटी सदस्य डॉ. गुंजाळ, कार्ले पाटील ,गुरुकुल समन्वयक सर्जेराव मते, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य, शारदा ज्युनियर कॉलेजचे प्र. उपप्राचार्य जगताप , एज्यूटॉपच्या मुख्याध्यापिका निशा मॅडम, शारदा कन्या विद्यालयाचे प्र. मुख्याध्यापक साळवे, राहाता पंचक्रोशीतील शिक्षणप्रेमी, ग्रामस्थ, सर्व सेवक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यालयाचे आजी माजी विद्यार्थी, पालक यांच्याकडून विद्यालयावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

परिश्रम, गुणवत्ता आणि संस्कार यांचा सुंदर संगम म्हणजेच आपल्या विद्यालयाचे यश. इन्स्पायर अवॉर्ड मानक उपक्रम हा विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधनवृत्ती, सर्जनशीलता आणि नवकल्पनांना प्रोत्साहन देणारा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. या प्रदर्शनातील सहभागामुळे विद्यार्थ्याला देशभरातील विद्यार्थ्यांच्या नावीन्यपूर्ण संकल्पना जाणून घेण्याची आणि आपल्या वैज्ञानिक विचारांना अधिक व्यापक करण्याची संधी मिळाली.

सुकेवाडीत घनकचरा व्यवस्थापन कार्यशाळा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील सुकेवाडी येथे ग्रामपंचायतीच्या वतीने घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ बाबत विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायत सुकेवाडीच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमातून कचऱ्याचे योग्य वर्गीकरण, त्याची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट आणि गाव स्वच्छ व प्लास्टिकमुक्त ठेवण्याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली.

कार्यक्रमात जिल्हा परिषद अहिल्यानगरचे जल जीवन मिशन व जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाशी संबंधित प्रकल्प संचालक राजेंद्र देसले आणि सचिन थोरात यांनी उपस्थित महिलांना घनकचरा व्यवस्थापनाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी ओला कचरा, सुका कचरा, घातक कचरा आणि सॅनिटरी कचरा अशा चार प्रकारांत कचऱ्याचे वर्गीकरण करण्याचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. घरातूनच कचऱ्याचे योग्य वर्गीकरण केल्यास त्याची विल्हेवाट लावणे सुलभ होते आणि पर्यावरणाचे संरक्षण करण्यास मदत मिळते, असे मार्गदर्शन करण्यात आले.

तसेच ओल्या कचऱ्यापासून कंपोस्ट खत आणि गांडूळ खत तयार करण्याच्या पद्धती, प्लास्टिकमुक्त गावाची संकल्पना आणि स्वच्छतेचा मानवी आरोग्याशी असलेला संबंध याविषयी सोप्या भाषेत माहिती देण्यात आली. स्वच्छतेच्या सवयी घराघरांत रुजवून गावाच्या स्वच्छतेत प्रत्येकाने योगदान द्यावे, असे आवाहनही करण्यात आले.

या कार्यक्रमाला समनापूरचे ग्रामपंचायत अधिकारी दत्तात्रय रोडे, कुरणचे ग्रामपंचायत अधिकारी नितीन सोनवणे आणि समूह समन्वयक योगेश पारखे उपस्थित होते. आशा सेविका, अंगणवाडी सेविका तसेच बचत गटांच्या महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

गावात घरोघरी कचऱ्याचे वर्गीकरण करणे, स्वच्छतेच्या नियमांचे पालन करणे आणि प्लास्टिकचा वापर कमी करून सुकेवाडी गाव स्वच्छ, सुंदर व प्लास्टिकमुक्त बनविण्यासाठी सक्रिय सहभाग घेण्याचा संकल्प यावेळी महिलांनी व्यक्त केला.

विकलांग पार्टी महिला मोर्चाच्या जिल्हा सचिवपदी तबस्सुम शेख




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : राष्ट्रीय विकलांग पार्टीच्या महिला मोर्चाच्या जिल्हा सचिवपदी संगमनेर तालुक्यातील तळेगाव येथील तबस्सुम जाफर शेख यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष राजकुमारी शुक्ला यांनी त्यांच्यावर ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविली आहे.

दिव्यांग व्यक्ती, निराधार तसेच समाजातील वंचित घटकांप्रती असलेली संवेदनशीलता, सामाजिक कार्यातील योगदान आणि समाजसेवेची तळमळ लक्षात घेऊन तबस्सुम जाफर शेख यांची या पदासाठी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या माध्यमातून महिला मोर्चाचे संघटन अधिक बळकट होण्यासोबतच पक्षाच्या सामाजिक कार्याला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

महिला मोर्चाच्या जिल्हा सचिवपदाची जबाबदारी स्वीकारताना पक्षाची ध्येयधोरणे, नियम व तत्त्वांचे पालन करून दिव्यांग, निराधार आणि वंचित घटकांच्या हितासाठी प्राधान्याने कार्य करण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. तसेच संबंधित घटकांना न्याय, हक्क आणि सन्मान मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे, महिला मोर्चाचा विस्तार करणे आणि पक्षाचे संघटन मजबूत करण्यावर भर देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तबस्सुम जाफर शेख यांच्या नियुक्तीमुळे महिला संघटन आणि सामाजिक कार्याला चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत असून, त्यांच्या पुढील सामाजिक व राजकीय वाटचालीस विविध स्तरांतून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

कळसुबाई शिखरावर नवरात्रोत्सवाला दर्शनसाठी भाविकांची अलोट गर्दी



युवावार्ता (प्रतिनिधी)

राजुर - आदिवासींची कुलदेवता समजल्या जाणाऱ्या कळसुबाईच्या दर्शनासाठी आज पाचच्या माळीला अलोट गर्दी झाली होती कळसुबाई हे महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर आहे म्हणून त्याला 'महाराष्ट्रांचे एव्हरेस्ट' असे सुध्दा संबोधले जाते. कळसुबाई शिबिराची उंची ही बारी गावाच्या पायथ्यापासून १६४६ मी. उंच, इतकी आहे.

देवीचे मुळ घराणे हे इगतपुरी तालुक्यामध्ये असून इगतपुरी तालुक्यातील इंदोरच्या शेणे कुटुंबातील आहे. घट स्थापनेच्या वेळी नवरात्रमध्ये पाचवे आणि सातव्या माळीला कळसुबाई शिखरावरती ग्रुप गर्दी असते म्हणून या माळेला पाहुण्यांची माळ म्हणून ओळखले जाते. आज दहा ते बारा हजार भाविकांनी हाजरी लावली होती. कुळसुबाई शिखराच्या पायवाट वर पहिल्या टप्प्यापासून शेवटच्या टप्प्यापर्यंत ६ इंच उंच व ४५ इंच रुंद अशा १२०० पायऱ्या करण्यात आलेल्या आहेत. ज्या ठिकाणी खूपच अवघड रस्ता आहे व पायऱ्या करणे शक्य नाही अशा त्या ठिकाणी ५०० मीटरच्या अंतरावर नवीन शिडी व रॅलींग वन विभाग मार्फत करण्यात आले.

कळसुबाई ही देवी खरे तर त्र्यंबकेश्वर पासून ते भिमाशंकर पर्यंतच्या आदिवासी, जमातीच्या समन्वयाचे प्रतिक समजले जाते. कळसुबाईच्या दर्शनासाठी महाराष्ट्रातून कानाकोपऱ्यातून भाविक येतात. नगर नाशिक मुंबई या ठिकाणी सर्वात जास्त भाविक येतात. कळसुबाई शिखरावर छोट- मोठ हॉटल असल्यामुळे भाविकांची गैरसोय दूर होते. काही ठिकाणी अरुंद शिडी असल्यामुळे गर्दी होत असते.

जागतिक अन्नदिनानिमित्त अमृतवाहिनीत १६ व १७ ऑक्टोबरला 'फूड एक्स्पोचे आयोजन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -जागतिक अन्नदिनाचे औचित्य साधून अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेच्या अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या वतीने शुक्रवार, दि. १६ व शनिवार, दि. १७ ऑक्टोबर २०२६ रोजी 'फूड एक्स्पो २०२६' या भव्य अन्नप्रक्रिया तंत्रज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता अमृतवाहिनी शिक्षण संकुलातील वसंतदादा क्रीडा संकुल येथे संस्थेचे अध्यक्ष तथा माजी कृषीमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती प्राचार्य डॉ. राजेंद्र वाघ यांनी दिली आहे

या प्रदर्शनाबाबत अधिक माहिती देताना ते म्हणाले की, अन्नप्रक्रिया क्षेत्रातील आधुनिक



तंत्रज्ञान, नाविन्यपूर्ण संकल्पना आणि कृषी उत्पादनांच्या मूल्यवर्धनाच्या विविध संधी सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविणे हा या प्रदर्शनाचा प्रमुख उद्देश आहे. अन्नाची गुणवत्ता व सुरक्षितता, आधुनिक प्रक्रिया तंत्रज्ञान, अन्नाची नासाडी कमी करण्याचे उपाय तसेच विविध कृषी उत्पादनांपासून मूल्यवर्धित पदार्थ तयार करण्याच्या संधींची माहिती या प्रदर्शनातून देण्यात येणार आहे. शेतमालाला योग्य बाजारपेठ मिळवून देण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी अन्नप्रक्रिया उद्योग महत्त्वाची भूमिका बजावतात. कृषी उत्पादनांवर प्रक्रिया करून त्यांचे मूल्य वाढविल्यास शेतकऱ्यांना आर्थिक लाभ मिळण्याबरोबरच ग्रामीण भागात उद्योग आणि रोजगारनिर्मितीलाही चालना मिळू शकते. विशेषतः ग्रामीण भागातील तरुण, महिला बचतगट आणि नवउद्योजकांसाठी अन्नप्रक्रिया उद्योग हे स्वयंरोजगाराचे प्रभावी माध्यम ठरू शकतात. या दृष्टीने 'फूड एक्स्पो २०२६' हे प्रदर्शन मार्गदर्शक ठरणार आहे. या प्रदर्शनामुळे विद्यार्थी, शेतकरी, अन्नप्रक्रिया उद्योजक आणि नागरिकांना अन्नतंत्रज्ञानातील नवनवीन संकल्पना जाणून घेण्याची संधी मिळणार आहे. कृषी उत्पादनांचे मूल्यवर्धन, अन्नप्रक्रिया उद्योगाची उभारणी, व्यवसायाच्या नव्या संधी आणि रोजगारनिर्मिती यांविषयी उपयुक्त माहिती या उपक्रमातून उपलब्ध होणार आहे.

प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी संस्थेचे महाराष्ट्राचे माजी कृषिमंत्री बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ सुधीर तांबे ,आमदार सत्यजित तांबे ,डॉ जयश्रीताई थोरात संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त सौ शरयूताई देशमुख पदाधिकारी, मान्यवर अतिथी आणि अन्नप्रक्रिया क्षेत्रातील प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. विद्यार्थी, शेतकरी, महिला बचतगट, अन्नप्रक्रिया उद्योजक तसेच नागरिकांनी या प्रदर्शनाला मोठ्या संख्येने भेट देऊन आधुनिक अन्नप्रक्रिया तंत्रज्ञानाची माहिती घ्यावी आणि उपलब्ध व्यावसायिक संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा

चारा बियाणे वाटपाच्या अटींमध्ये शासनाकडून शिथिलता!

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- राज्यातील कमी पर्जन्यमानामुळे निर्माण झालेल्या दुष्काळजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पशुपालक शेतकऱ्यांना दिलासा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. सन २०२६-२७ या वर्षासाठी मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेंतर्गत (जिल्हा वार्षिक योजना) राबविण्यात येणाऱ्या वैरण उत्पादन कार्यक्रमातील चारा बियाणे व ठोंबे वाटपाच्या अटी व शर्तींमध्ये शिथिलता देण्यास शासनाने मान्यता दिली आहे. याबाबत पशुसंवर्धन विभागाने १४ ऑक्टोबर २०२६ रोजी शासन निर्णय निर्गमित केला असून, या निर्णयामुळे दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना चारा उत्पादनासाठी प्रोत्साहन मिळणार आहे.



राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये कमी पर्जन्यमानामुळे दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. या परिस्थितीत जनावरांसाठी आवश्यक हिरव्या चाऱ्याची उपलब्धता वाढविणे आणि संभाव्य चारा टंचाईवर मात करणे अत्यंत आवश्यक झाले आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने चारा उत्पादनास प्राधान्य देत योजनेच्या अटींमध्ये महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. दिनांक ९ मार्च २०२६ च्या शासन निर्णयानुसार वैरण उत्पादन कार्यक्रमाचा लाभ घेण्यासाठी वैयक्तिक लाभार्थ्याकडे स्वतःचे किमान तीन ते चार पशुधन असणे आवश्यक होते. मात्र, दुष्काळजन्य परिस्थिती लक्षात घेऊन ही अट सन २०२६-२७ या वर्षापुरती शिथिल करण्यात आली आहे. त्यामुळे चारा उत्पादनासाठी इच्छुक असलेल्या अधिकाधिक पात्र शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

या योजनेंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांना एक हेक्टर क्षेत्राच्या मर्यादित चारा उत्पादनासाठी १०० टक्के अनुदानावर चार हजार रुपये किमतीचे चारा बियाणे उपलब्ध करून देण्यात येते. तसेच शेतकरी समूह गटांना पाच हेक्टर क्षेत्राच्या मर्यादित १०० टक्के अनुदानावर वीस हजार रुपये किमतीचे चारा बियाणे देण्यात येते.

यापूर्वी या योजनेचा लाभ वर्षातून एकदाच घेता येत होता. मात्र, सुधारित निर्णयानुसार चारा उत्पादनासाठी आवश्यक पाणीसाठा उपलब्ध असल्यास पात्र वैयक्तिक लाभार्थी आणि शेतकरी समूह गटांना वर्षातून एकापेक्षा अधिक वेळा चारा बियाण्यांचा लाभ मिळू शकणार आहे. तथापि, प्रथमच लाभ घेण्याची मागणी करणारा पाणीसाठा उपलब्ध असलेला अन्य अर्जदार नसल्यासच पुन्हा लाभ देण्यात येणार आहे.

संपादकीय...

सोशल मीडिया : मैत्रीचे व्यासपीठ की फसवणुकीचे महाजाल ?

आजच्या डिजिटल युगात सोशल मीडिया हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉट्सप यांसारख्या माध्यमांनी जग जवळ आणले आहे. हजारो किलोमीटर दूर असलेल्या व्यक्तीशी क्षणात संवाद साधता येतो, जुन्या मित्रांचा शोध घेता येतो, विचारांची देवाणघेवाण करता येते आणि व्यवसायालाही नवी दिशा देता येते. मात्र, याच मैत्रीच्या व्यासपीठाचा वापर काही समाजकंटकांकडून फसवणूक, ब्लॅकमेलिंग आणि गुन्हेगारी कृत्यांसाठी होत असेल, तर या तंत्रज्ञानाच्या उपयोगाबरोबरच त्याच्या धोक्यांचाही गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. सोशल मीडियावर एखाद्या व्यक्तीशी ओळख होणे, संवाद वाढणे आणि मैत्री निर्माण होणे ही आजच्या काळातील सामान्य बाब आहे. परंतु, आभासी जगात दिसणारी प्रत्येक व्यक्ती खरी असेलच, असे नाही. बनावट छायाचित्रे, खोटी नावे, दिशाभूल करणारी माहिती आणि गोड बोलण्याच्या माध्यमातून अनेकांची फसवणूक केली जाते. सुरुवातीला मैत्री, नंतर भावनिक जवळीक आणि त्यानंतर पैशांची मागणी, वैयक्तिक छायाचित्रांचा गैरवापर किंवा भेटण्यासाठी दबाव, अशा प्रकारे काही प्रकरणांमध्ये फसवणुकीचे जाळे विणले जाते. विशेषतः किशोरवयीन मुले-मुली भावनिकदृष्ट्या संवेदनशील असतात. त्यांना नवीन मैत्रीचे आकर्षण असते, स्वतःचे विचार कोणाशी तरी मोकळेपणाने व्यक्त करण्याची इच्छा असते. अशा वेळी समोरच्या व्यक्तीचा खरा हेतू ओळखणे नेहमीच सोपे नसते. त्यामुळे ऑनलाइन ओळखीचे रूपांतर धोकादायक परिस्थितीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अलीकडील काळात सोशल मीडियावरील ओळखीतून निर्माण होणाऱ्या फसवणुकीच्या घटनांमुळे पालक आणि समाजासमोर नवे प्रश्न उभे राहत आहेत. एखाद्या अनोळखी व्यक्तीने मैत्रीच्या नावाखाली भेटण्याचा आग्रह धरणे, नकार दिल्यानंतर धमकावणे किंवा भावनिक दबाव टाकणे, या बाबी केवळ वैयक्तिक स्वरूपाच्या राहत नाहीत. त्यातून व्यक्तीच्या सुरक्षिततेचा आणि स्वातंत्र्याचा प्रश्न निर्माण होतो. मुलांच्या हातात स्मार्टफोन देणे ही काळाची गरज असली, तरी डिजिटल जगातील सुरक्षिततेचे शिक्षण देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. केवळ मोबाईल वापरू नकोस, सोशल मीडियापासून दूर राहा, अशी बंधने घालून प्रश्न सुटणार नाही. उलट, मुलांना विश्वासात घेऊन त्यांच्याशी संवाद साधणे, ऑनलाइन मैत्रीतील धोके समजावून सांगणे आणि अडचणीत सापडल्यास न घाबरता पालकांना सांगण्याचे धैर्य देणे आवश्यक आहे. सोशल मीडियाचे सर्वच पैलू नकारात्मक नाहीत. शिक्षण, रोजगार, व्यवसाय, सामाजिक जनजागृती आणि आपत्कालीन मदत यांसाठी या माध्यमांनी मोठे योगदान दिले आहे. अनेक तरुणांनी याच माध्यमांचा वापर करून आपली कला, कौशल्ये आणि उद्योजकता जगासमोर आणली आहे. त्यामुळे सोशल मीडियावर सरसकट बंदी घालणे किंवा त्याला दोष देणे हा योग्य मार्ग ठरणार नाही. गरज आहे ती विवेकपूर्ण वापराची आणि जबाबदार डिजिटल संस्कृतीची. ऑनलाइन संवाद साधताना वैयक्तिक माहिती, घराचा पत्ता, शाळा-महाविद्यालयाची माहिती, ओळखपत्रे किंवा खासगी छायाचित्रे अनोळखी व्यक्तींना पाठवणे टाळले पाहिजे. संशयास्पद लिंक, अनोळखी व्यक्तींकडून येणाऱ्या आर्थिक मागण्या आणि भेटण्यासाठी होणारा दबाव याबाबत सतर्क राहिले पाहिजे. कोणतीही व्यक्ती धमकावत असेल किंवा खासगी माहितीच्या आधारे ब्लॅकमेल करत असेल, तर घाबरून पैसे देण्याऐवजी पुरावे जतन करून पोलिसांची मदत घेणे आवश्यक आहे.

डिजिटल सुरक्षितता ही केवळ व्यक्तीची जबाबदारी नाही. पालकांनी मुलांच्या ऑनलाइन जगाबद्दल जागरूक राहिले पाहिजे; मात्र त्यांच्यावर अविश्वास दाखवण्याऐवजी संवादाचे नाते अधिक मजबूत केले पाहिजे. शाळा-महाविद्यालयांनी सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शनपर उपक्रम राबवावेत. सोशल मीडिया कंपन्यांनी बनावट खात्यांवर आणि छळवणुकीवर प्रभावी कारवाई करावी. तसेच, सायबर गुन्ह्यांच्या तक्रारींची तत्पर दखल घेऊन दोषींवर कायद्यानुसार कठोर कारवाई होणे गरजेचे आहे.

मालपाणी विद्यालयात वाचन प्रेरणा दिन व जागतिक हात धुवा दिन उत्साहात साजरा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - येथील मातोश्री रु. दा. मालपाणी विद्यालयात भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ व लेखक डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला. याचबरोबर विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी जागतिक हात धुवा दिन देखील उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक उत्तम एरंडे होते. यावेळी पर्यवेक्षिका रंजना पवार, पालक प्रतिनिधी सुधीर कोकणे, कलाशिक्षक संतोष गोरे, मदन अरगडे आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते डॉ. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. हर्षदा नरेंद्र बुऱ्हाडे हिने उपस्थित मान्यवरांचा परिचय करून दिला व त्यांचे स्वागत केले.

प्रतापराव ठोंबरे यांनी प्रास्ताविकातून वाचन संस्कृतीचे महत्त्व विशद केले. डॉ. अब्दुल कलाम यांचे वाचनप्रेम, विद्यार्थ्यांविषयीची आस्था आणि पुस्तकांचे जीवनातील स्थान याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. तसेच पुस्तकांवर आधारित कवितांचे वाचन केले. याप्रसंगी आदित्य दीपक भोकनळ, जान्हवी सचिन भोकनळ, अनिश अनिल सिनारे व रुद्र पुरुषोत्तम जोशी या विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृतीचे महत्त्व अधोरेखित करणारी समयोचित भाषणे केली.

पालक प्रतिनिधी सुधीर कोकणे यांनी डॉ. कलाम यांच्या जीवनकार्याची माहिती देत त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांचा परिचय करून दिला. विद्यार्थ्यांनी दररोज नियमितपणे वाचन करावे, असे आवाहन त्यांनी केले. पर्यवेक्षिका रंजना पवार यांनी प्रकट वाचन कसे करावे, पुस्तकांना आपले मित्र कसे मानावे आणि त्यांची योग्य प्रकारे काळजी कशी घ्यावी, याविषयी मार्गदर्शन केले.

जागतिक हात धुवा दिनानिमित्त कलाशिक्षक संतोष गोरे व विद्यार्थ्यांनी हात धुण्याची शास्त्रोक्त पद्धत प्रात्यक्षिकाद्वारे समजावून सांगितली. बाहेरून घरी आल्यानंतर तसेच जेवणापूर्वी योग्य पद्धतीने हात धुण्याची सवय लावून घ्यावी, असे आवाहन विद्यार्थ्यांना करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल सिनारे व ईशान अनिल गीते यांनी केले, तर मनस्वी पोपट सहाणे हिने आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी इयत्ता आठवीच्या वतीने प्रतापराव ठोंबरे व आदित्य संतोष साबळे यांनी विशेष परिश्रम घेतले. वाचनातून ज्ञानसमृद्धी आणि स्वच्छतेतून आरोग्यसंपन्न जीवन हा संदेश या उपक्रमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आला.

संगमनेरमध्ये शुक्रवारी 'श्रीसूक्त पठण व कुंकुमार्चन सोहळा'

शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त लक्ष्मीनारायण मंदिरात आयोजन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शारदीय नवरात्रोत्सव २०२६ निमित्त संगमनेर पुरोहित मंडळ संचलित वैदिक पुरोहित बहुउद्देशीय प्रतिष्ठान आणि सकल साळी समाज, संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि. १६ ऑक्टोबर) 'श्रीसूक्त पठण व कुंकुमार्चन सोहळ्या'चे आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक सोहळा लक्ष्मीनारायण मंदिर, संगमनेर येथील लक्ष्मी चौक परिसरात दुपारी ४ वाजता होणार आहे.

नवरात्रोत्सवाच्या पावन पर्वात देवीच्या उपासनेला विशेष महत्त्व आहे. श्रीसूक्त पठण आणि कुंकुमार्चनाच्या माध्यमातून भक्तिभाव, श्रद्धा आणि धार्मिक परंपरेचा जागर करण्यात येणार आहे. या सोहळ्यामुळे महिलांना सामूहिक धार्मिक उपासनेची संधी मिळणार असून, परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे. या कार्यक्रमाला ब्राह्मण प्रतिष्ठान, रेणुका माता उत्सव समिती, साळीवाडा, सोमेश्वर सांगारगळी मित्र मंडळ, महाराणा प्रताप महिला मंडळ, पद्मशाली समाज महिला मंडळ आणि देवी गल्ली मित्र मंडळ यांचे विशेष सहकार्य लाभणार आहे.

वैदिक पुरोहित बहुउद्देशीय प्रतिष्ठानचे अध्यक्ष कैलास जोशी, उपाध्यक्ष चेतन मुळे, सचिव प्रमोद जोशी आणि खजिनदार ऋषिकेश मुळे यांच्यासह संचालक मंडळ कार्यक्रमाच्या आयोजनासाठी प्रयत्नशील आहे. संचालक मंडळात उत्कर्ष जोशी, समीर सराफ, महेश सांबरे, स्वप्नील मुळे, वैभव उपासनी आणि गोकुळ कुलकर्णी यांचा समावेश आहे. या धार्मिक सोहळ्याचा लाभ संगमनेर शहर व परिसरातील सर्व महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

नान्नज विद्यालयाची प्राची रामकर विभागीय पातळीवर

युवावार्ता (प्रतिनिधी)

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे,जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद अहिल्यानगर यांचे वतीने आयोजित शालेय जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत नान्नज दुमाला येथील श्री संत ज्ञानेश्वर माऊली विद्यालयाच्या प्राची विलास रामकर हिची उंच उडी क्रीडा प्रकारात विभागीय पातळीवर निवड झाली आहे अशी माहिती मुख्याध्यापक एच आर सोनवणे यांनी दिली.



प्रवरानगर येथे नुकत्याच झालेल्या शालेय जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत १७ वर्षे वयोगटात उंच उडी क्रीडा प्रकारात प्राची रामकर हिने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

या यशाबद्दल प्राची रामकर हिचे लोकनेते मा. ना. बाळासाहेब थोरात, सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक समाज संस्थेचे चेअरमन माजी विधान परिषद सदस्य डॉ. सुधीर तांबे, आ. सत्यजित तांबे,सह्याद्री संस्थेचे सचिव सुमंत कोल्हे, संचालक बाबा खरात, व बाबासाहेब कडनर, स्थानिक स्कुल कमिटीचे व्हाईस चेअरमन विठ्ठल गायकवाड, सदस्य नारायण चत्तर, विनायक गुंजाळ, नानासाहेब चत्तर, दिनकर चत्तर कैलास बाचकर , पांडुरंग फड, मधुकर गायकवाड तसेच मुख्याध्यापक एच आर सोनवणे आदिसह सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व ग्रामस्थांनी हार्दिक अभिनंदन केले आहे. सदर खेळाडूस क्रीडाशिक्षक मंगेश गडाख, बाळासाहेब पिंगळे, मच्छिन्द्र पवार आदि शिक्षकांनी मौलिक मार्गदर्शन केले.

दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता ०२४२५ २२५१२९

ग्रामपंचायत वडगाव, ता. कोपरगाव, जि. अ.नगर

मौजे वडगाव, ता. कोपरगाव, जि. अहिल्यानगर, हे खाली नमुद केलेल्या कामासाठी नोंदणीकृत संस्था/नोंदणीकृत पुरवठादार / ठेकेदार यांचेकडून ब-१ निविदा मागवित आहेत. सदर निविदा ग्राम. कार्यालय मौजे वडगाव, ता. कोपरगाव, येथे कार्यालयीन वेळेत सकाळी १०.०० वा. ते सायं ५.०० वा. पर्यंत रुपये १००/- रोखीने भरून प्राप्त होतील. दि. १६/१०/२०२६ ते २२/१०/२०२६ पर्यंत सकाळी १० ते दु. ३ वा. पर्यंत प्राप्त झालेल्या निविदा दि. २३/१०/२०२६ रोजी सायं. ५.०० वा. ग्रा.पं. कार्यालयात शक्य झाल्यास हजर असणारे ठेकेदार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

अ. क्र.	कामाचे नाव	योजना	अंदाजित रक्कम	निविदा फी	वर्गवारी
१.	ग्रा. पं. वडगाव ता. कोपरगाव अंतर्गत स्मशानभुमी पाण्याची टाकी बांधकाम करणे	१५ वा वित्त आयोग २०२५-२६	१३५०३३	२३६	सु. बे.

अटी व शर्ती :- १. सविस्तर सुचना व माहिती ग्रामपंचायत चांदगव्हाण, ता. कोपरगाव येथे कार्यालयात पहावयास मिळतील. २. सदर कामाचे कोणतेही दरपत्रक अथवा नामंजुर करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवला आहे. तसेच अटीयुक्त दरपत्रक फेटाळण्यात येतील. याची नोंद घ्यावी.

ग्रामसेवक, ग्रा.पं. वडगाव, ता. कोपरगाव, जि. अ.नगर — सरपंच, ग्रा.पं. वडगाव, ता. कोपरगाव, जि. अ.नगर

जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

खालील तपशिलात नमुद मिळकत ही तिचे विद्यमान मालक लता धोंडिराम भंडारी, हिरामन धोंडिराम भंडारी व राजु धोंडिराम भंडारी हल्ली रा. काळेवाडी, पिंपरी चिंचवड, पुणे यांचे मालकीचे असून अनेक वर्षांपासून सदर मिळकत ही आमचे अशिलांचे ताब्यात व वहिवाटीस आहे. असे असताना सदर मिळकतीचे उपरोक्त नमुद मालक खाली परिशिष्टात नमुद मिळकत त्रयस्थ इसमास विक्री करण्याचे खटपटीत आहेत. असे आमचे अशिलास खात्रीलायक समजले आहे.

सबब, या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील नमुद मिळकतीचा व्यवहार तिचे मालकांबरोबर कोणीही करु नये, तसे केल्यास सदर व्यवहाराबाबत आमचे अशिल योग्य ती न्यायालयीन कारवाई करतील व खरेदी घेणार यांस जागेचा तावा / कब्जा मिळणार नाही. याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसवणूक होवू नये यासाठी सदर नोटीस प्रसिध्द केली आहे. नंतर कोणाचीही हरकत अगर तक्रार असल्यास ती विचारात घेतली जाणार नाही. परस्पर वर्तमानपत्रात दिलेली हरकत अगर तोंडी हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन –

जिल्हा अहिल्यानगर, सब डिव्हीजन व तालुका संगमनेर पैकी मौजे संगमनेर बु.. येथील नगरपालिका हद्दीतील बखळ प्लॉट मिळकत संपुर्ण सुखसुविधा व तळजागेसह.

सि.स.नं.	क्षेत्र चौ.मी.
११३०	७६.९०

यांसी चतु: सिमा – रेकॉर्ड आफ राईटप्रमाणे

दिनांक -१४/१०/२०२६
स्थळ- संगमनेर

ॲड. राजेश जे. भुतडा
८२६, बाजारपेठ, संगमनेर
ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर

शेतकरी उत्पादक कंपनीमध्ये रोजगाराची संधी!

भरती सुरू आहे

कृषी क्षेत्रात काम करण्याची सुवर्णसंधी!

पदाचे नाव:-फिल्ड कॉर्डिनेटर - २

कामाचे स्वरुप:-
शेतकऱ्यांबरोबर समन्वय साधणे,शेतकऱ्यांच्या शेतीविषयक मार्गदर्शन व समन्वय,शेतकरी गट/ सभासदांशी नियमित संपर्क ठेवणे, कंपनीच्या कृषीविषयक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करणे

शैक्षणिक पात्रता
पदवीधर/कृषी पदविका/तत्सम शैक्षणिक पात्रता शेती विषयक कामाचा अनुभव असणे गरजेचे

वयोमर्यादा, २५ ते ३५ वर्षे कार्यस्थळ,संगमनेर तालुका

इच्छुक उमद्वारांनी बायोडाटा पुढील नंबरवर दि. १८/११/२०२६ व्हॉटसॲप किंवा इमेलवर पाठवावा. संपर्क:9850119046
Email:ens.krishivikasfpc@gmail.com
कृषी क्षेत्रात काम करण्याची आवड आणि शेतकऱ्यांसोबत काम करण्याची क्षमता असलेल्या उमेदवारांनी आजच अर्ज करावा!

२ बीएचके फ्लॅट्स उपलब्ध!

पत्ता
SBI कॉलनीजवळ, जनता नगर, संगमनेर
संपर्क क्रमांक:
9850569862
9834825883

पाहिजेत

रिसेप्शनिस्ट- १
(स्त्री / पुरूष)
शिक्षणास प्राधान्य
कॉम्प्युटर ज्ञान,
- संपर्क -
8378956909
8459199913
बायोडाटा पाठवा

पाहिजेत

ध्येय फायनान्स संगमनेर
Branch manager BM-1
Branch devlopment Menegar BDM- 1
Sales devlopment MenegarSDM - 1
Telicaller - 2 M/F
कार्यालय - युवा ध्येय, विठ्ठल स्मृती कॉम्प्लेक्स, अकोले रोड, संगमनेर
फोन (०२४२५)२६१८७२
9370773504
7768079272

जाहीर लिलाव

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोल्हाटवाडी (रतनवाडी)
ता. अकोले, जि. अहिल्यानगर
जि. प. प्राथ शाळा कोल्हाटवाडी (रतनवाडी)
Udise-No- 27260113701 ता. अकोले, जि. अहिल्यानगर
येथील जुनी खोली क्र. १,२,३,४, चे साहित्य (सिमेंट पत्रे, लोखंडी कैची, लोखंडी परलिंगा, लोखंडी अडावळा, शहाबादी फरशी, विटा, दगड इ.) चा लिलाव
सोमवार दि. १९/१०/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. शाळेत होईल.

मुख्याध्यापक
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोल्हाटवाडी (रतनवाडी)
अकोले, जि. अहिल्यानगर



CHANGE IN NAME

I HAVE CHANGED MY OLD NAME
TANZIM MUKHTAR QURESHI
NEW NAME AS
TANJIM FAIZAN SAYYED
ADD – GAUSIYA MASJID JAWAL , MADINA NAGAR, SANGAMNER , TAL - SANGAMNER DIST - AHMEDNAGAR

पाहिजेत

अकाऊंटंट - २ जागा
कॅशिअर - २ जागा
सेल्समन - १० जागा (पु.)
सेल्समन - १० जागा (म.)
वॉचमन - २ जागा
आकर्षक पगार दिले जाईल
मुळचंद होलसेल मिल डेपो
अकोले रोड, सेलिब्रेश हॉटेल समोर, संगमनेर
7498901766

पाहिजेत

ड्रायव्हर कम हेल्पर पाहिजे
आत्मशांती टी सेंटर
(सपट चहा)
नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

पाहिजेत

सेल्समन - ४ जागा
अकाऊंटंट - १ जागा
मॅनेजर - १ जागा
(अनुभवास प्राधान्य)
आकर्षक पगार दिले जाईल
मैड सराफ ॲण्ड सन्स
नेहरूचौक, संगमनेर
9850530266

पाहिजेत

डिप्लोमा सिव्हिल इंजिनिअर - 2 जागा
स्वतःची टू व्हीलर लायसन्स आवश्यक
B & K Construction
7758009532
7028456005

Urgently Required

Office Manager
Sangamner (1 Post)
Valuation Report Typist, Property Visit.
Office Management.
Contact-
9421911671





भाड्याने देणे आहे

टॉप टेन इम्पेरिअल (रिलायन्स डिजीटल) मध्ये ग्राउंड फ्लोअरचे दोन शॉप किंवा ऑफिस भाड्याने देणे आहे
- संपर्क -
9730380303
9552690909

जागा भरणे आहे

ऑफिस बॉय ऑफिस क्लार्क
महिला किंवा पुरूष
इलेक्ट्रॉनिक मशिनरी चालविणेचा अनुभव असलेला कारागीर
वॉचमेन
अनुभवास प्राधान्य
- संपर्क -
9822334431

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
ताम्हाणे हॉस्पिटल
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी

दैनिक
युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25



डिग्रस परिसरात बिबट्याचा धुमाकूळ सुरूच

हल्ल्यात महिला गंभीर जखमी



युवावार्ता (प्रतिनिधी)

अंभोरे - संगमनेर तालुक्यातील डिग्रस गावात व परिसरात बिबट्याच्या हल्ल्यांचे सत्र सुरूच असून, बुधवारी (दि. १४) सकाळी पुन्हा एका महिलेवर बिबट्याने हल्ला केल्याची घटना घडली. या हल्ल्यात आशा संतोष निठवे (वय ३०) हि शेतकरी महिला गंभीर जखमी झाल्या आहेत. त्यांना तातडीने संगमनेर शहरातील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. वारंवार घडणाऱ्या या घटनांमुळे डिग्रस परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, शेतकरी, महिला आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला.

मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी सकाळी सुमारे सात वाजण्याच्या दरम्यान आशा निठवे या कांद्याच्या पिकातील रोपांची निंदणी करण्यासाठी शेताकडे जात होत्या. यावेळी कपाशीच्या शेतात दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक त्यांच्यावर हल्ला केला. अनपेक्षितपणे झालेल्या या हल्ल्यामुळे परिसरात घबराट उडाली. मात्र, महिलेने प्रसंगावधान राखत आरडाओरड केल्याने बिबट्याने तेथून पळ काढला. या हल्ल्यात महिलेच्या चेहऱ्यासह शरीरावर गंभीर जखमा झाल्या आहेत. घटनेनंतर त्यांना तातडीने संगमनेर येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा लावण्यात आला आहे. मात्र, परिसरात बिबट्याचा वावर आणि वारंवार होणाऱ्या हल्ल्यांमुळे ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण कायम आहे. डिग्रस परिसरात यापूर्वीही बिबट्याच्या हल्ल्याच्या घटना घडलेल्या आहेत, आता पुन्हा दिवसा महिलेवर हल्ला झाल्याने शेतात काम करण्यासाठी जाणाऱ्या शेतकरी कुटुंबांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. बिबट्याच्या हल्ल्यांच्या घटनांना आळा घालण्यासाठी वनविभागाने केवळ तात्पुरत्या उपाययोजनांवर अवलंबून न राहता प्रभावी आणि कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

ट्रकचालकाला मारहाण करून जीवे मारण्याची धमकी

आरोपीला कारावासाची शिक्षा

युवावार्ता (प्रतिनिधी)

समनापूर : रस्त्यावर ट्रक आणि पिकअप वाहनाच्या चालकांमध्ये झालेल्या वादातून ट्रकचालकाला मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी संगमनेर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाने आरोपीला कारावासाची शिक्षा सुनावली आहे. शफिक चौघुले असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव असून, भारतीय दंड संहितेच्या कलम ३२३ नुसार तीन महिने कारावास व एक हजार रुपये दंड, तर कलम ५०६ नुसार एक महिना कारावासाची शिक्षा न्यायालयाने ठोठावली आहे.

या प्रकरणातील घटना ३० सप्टेंबर २०१८ रोजी रात्री सुमारे नऊ वाजण्याच्या सुमारास घडली होती. ट्रकचालक गंगाधर भागा वाळुंज हे उसाने भरलेला ट्रक कौठे मलकापूर येथील युटेक शुगर फॅक्टरीकडे घेऊन जात होते. त्यावेळी साकूर परिसरात ट्रक आणि पिकअप वाहनाच्या चालकांमध्ये वाद झाला. या वादाचे रूपांतर मारहाणीत झाले. पिकअपचालक शफिक चौघुले याने वाळुंज यांना मारहाण केल्याचा आरोप होता.

या मारहाणीत फिर्यादीच्या डाव्या कानाजवळ आणि तोंडावर दुखापत झाली होती. तसेच, फिर्यादीला पिकअपमध्ये बसवून नदीत फेकून देण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले होते. या घटनेप्रकरणी घारगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घारगाव पोलिसांनी तपास पूर्ण करून आरोपीविरुद्ध सबळ पुरावे गोळा केले आणि न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. संगमनेर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश मंदार नेरलेकर यांच्या न्यायालयात या खटल्याची सुनावणी झाली. सुनावणीदरम्यान सरकारी पक्षातर्फे एकूण सात साक्षीदारांच्या साक्षी नोंदविण्यात आल्या. परिस्थितीजन्य पुरावे, वैद्यकीय पुरावे आणि सरकारी पक्षाने सादर केलेल्या साक्षींचा विचार करून न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवत शिक्षा सुनावली.

या प्रकरणाचा तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक अन्सार ईनामदार यांनी केला. सरकारी पक्षातर्फे सरकारी वकील मच्छिंद्र गवते यांनी न्यायालयीन कामकाज पाहिले, तर पैरवी अधिकारी म्हणून सहाय्यक फौजदार प्रवीण डावरे यांनी सहकार्य केले. या प्रकरणात न्यायालयात प्रभावीपणे बाजू मांडल्याबद्दल घारगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांनी सरकारी वकील मच्छिंद्र गवते आणि पैरवी अधिकारी प्रवीण डावरे यांचे कौतुक केले.

इंटरनेट बंद प्रकरणी केंद्र सरकारची न्यायालयात माफी



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

केंद्रीय गृह सचिव गोविंद मोहन यांनी दिल्लीत इंटरनेट बंद करण्याच्या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाची बिनशर्त माफी मागितली आहे. त्यांनी न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे की, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि अफवा रोखण्यासाठी हे पाऊल उचलावे लागले. दरम्यान, मेट्रो सेवेच्या मुद्द्यावर डीएमआरसीने सांगितले की, मेट्रो सेवा पूर्णपणे बंद करण्यात आली नव्हती. केवळ ४५ स्थानकांवर वाहतूक थांबवण्यात आली होती.

संपूर्ण प्रकरण १० ऑक्टोबर रोजी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात कॉकरोच जनता पक्षाने पुकारलेल्या आंदोलनाशी संबंधित आहे. पोलिसांची परवानगी नसल्यामुळे दिल्लीत कडेकोट बॅरिकेडिंग करण्यात आली होती, मेट्रो स्थानके बंद करण्यात आली होती, इंटरनेट सेवा बंद करण्यात आली होती आणि अनेक आंदोलकांना ताब्यात घेण्यात आले होते. सर्वोच्च न्यायालयाने ११ ऑक्टोबर रोजी या निर्बंधांवर नाराजी व्यक्त करत सरकार आणि प्रशासनाकडून उत्तर मागितले होते. न्यायालय या प्रकरणाशी संबंधित याचिकांवर आता सुनावणी करत आहे. दिल्लीचे पोलिस आयुक्त अनुराग कुमार यांनी सांगितले की, आंदोलकांना रोखणे आणि ताब्यात घेणे हे कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक होते. त्यांनी उगझ वर हिंसाचार, मालमत्तेचे नुकसान आणि लोकांना जखमी केल्याचा आरोप केला.

गैर हिंदू धर्मांतर केल्यास मागास प्रवर्गाचा लाभ नाही; सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्ली - सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी सांगितले की, हिंदू धर्मातून गैर-हिंदू धर्म स्वीकारणारी व्यक्ती जुन्या सामाजिक दर्जाच्या आधारावर आरक्षणाचा लाभ मागू शकत नाही. न्यायालयाने या प्रकरणातील मद्रास उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला आहे.

वास्तविक, सरकारने ९ मार्च २०२४ रोजी मागासवर्ग, अतिमागासवर्ग, विमुक्त समुदाय आणि अनुसूचित जातीतील लोकांना इस्लाम स्वीकारल्यानंतर मुस्लिम मागासवर्गात समाविष्ट करण्याची परवानगी दिली होती. मात्र, मद्रास उच्च न्यायालयाने या निर्णयाला स्थगिती दिली होती. त्यानंतर या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. मात्र, न्यायालयाने मद्रास उच्च न्यायालयाचा निर्णय योग्य ठरवला आहे.

न्यायमूर्ती प्रशांत कुमार मिश्रा आणि न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर यांच्या खंडपीठाने सांगितले की, हिंदू सामाजिक व्यवस्थेतून गैर-हिंदू सामाजिक व्यवस्थेत जाणारी व्यक्ती संविधानाच्या अनुच्छेद १६(४) अंतर्गत केवळ जुन्या सामाजिक मागासलेपणाच्या आधारावर सकारात्मक कृतीचा दावा करू शकत नाही. सर्वोच्च न्यायालयाने १९५० च्या संविधानातील अनुसूचित जाती आदेशाचा उल्लेख केला. न्यायालयाने म्हटले की, हिंदू, बौद्ध किंवा शीख धर्माव्यतिरिक्त इतर धर्माच्या लोकांना अनुसूचित जातीचा दर्जा देता येणार नाही. न्यायालयाच्या म्हणण्यानुसार, अशा व्यक्तीचा त्याच्या मूळ जातीशी संबंधित अनुसूचित जातीचा दर्जा संपुष्टात येतो.

दुष्काळग्रस्तांसाठी आ. डॉ. लहामटेंचा मदतीचा हात

मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी एक महिन्याचे वेतन

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - महाराष्ट्रात निर्माण झालेल्या दुष्काळजन्य परिस्थितीत सामाजिक बांधिलकीतून अकोले मतदारसंघाचे आमदार डॉ. किरण लहामटे यांनी आपले एक महिन्याचे संपूर्ण वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी दिले आहे. बुधवारी त्यांनी ही रक्कम उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुनेत्रा पवार यांच्याकडे सुपूर्द केली. यावेळी जलजीवन मिशनच्या अपूर्ण कामांविषयी प्रलंबित सुधारित प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत आमदार डॉ. लहामटे यांनी सुनेत्रा पवार यांच्याकडे मागणी केली. यावर त्यांनी तात्काळ कार्यवाहीच्या सूचना दिल्याचे लहामटे यांनी सांगितले. दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी यापुढेही गरज भासल्यास आपली तयारी असून, शेतकरी आणि नागरिकांना दिलासा देण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद चौधरी उपस्थित होते.



इन्स्टाग्रामवरील ओळखीचा फटका; नागरिकांच्या तत्परतेमुळे अल्पवयीन मुलीची सुटका

आश्वी पोलिसांत पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सोशल मीडियावरील इन्स्टाग्रामच्या माध्यमातून झालेल्या ओळखीचा गैरफायदा घेत एका अल्पवयीन मुलीचे पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट कारमधून बळजबरीने अपहरण करून तिच्याशी अश्लील वर्तन केल्याची खळबळजनक घटना आश्वी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. स्थानिक नागरिकांनी प्रसंगावधान राखून कारचा पाठलाग केल्याने मोठा अनर्थ टळला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आश्वी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका अल्पवयीन मुलीची सुमारे पाच महिन्यांपूर्वी इन्स्टाग्रामवर एका व्यक्तीशी ओळख झाली होती. मंगळवारी (१३ ऑक्टोबर) सकाळी ही पीडित मुलगी रस्त्याने पायी जात असताना संशयित आरोपी तिथे पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट कारमधून आला. त्याने मुलीला कारमध्ये बसण्याचा आग्रह केला. तिने स्पष्ट नकार दिल्यानंतरही आरोपीने तिला बळजबरीने कारमध्ये बसवले. 'माझ्याशी लग्न कर' असा दबाव टाकत त्याने तिच्याशी अश्लील आणि लज्जास्पद वर्तन केले व कार वेगाने संगमनेरच्या दिशेने पळवली.

हा संशयास्पद प्रकार आणि कारमधील मुलीची हालचाल काही स्थानिक नागरिकांच्या वेळीच लक्षात आली. त्यांनी कोणताही विलंब न लावता तातडीने आपल्या वाहनांवरून त्या स्विफ्ट कारचा पाठलाग सुरू केला. आपला पाठलाग होत असल्याचे लक्षात येताच आरोपीने पुढे जाऊन कार थांबवली आणि पीडित मुलीला रस्त्यावर उतरवून संगमनेरच्या दिशेने पळ काढला.

याप्रकरणी आश्वी पोलीस ठाण्यात संशयित आरोपीविरोधात गुन्हा रजिस्टर क्रमांक २१६/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता कलम १३७ (२), ७४, ८७, ३५१(२)(३), ३५२ तसेच पोक्सो कायद्याच्या कलम ८ आणि १२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून पसार झालेल्या आरोपीच्या शोधासाठी विशेष तपास पथके रवाना करण्यात आली आहेत.

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165



कुटे हॉस्पिटल
अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
सर्जरी विभाग: अतिदक्षता विभाग • अपघात विभाग
डायलिसीस विभाग: सुपर स्पेशालिटी विभाग • न्यूरोविभाग
हृदयरोग विभाग: मेडिसीन विभाग • अद्ययावत कॅथलॅब
जॉईंट रिप्लेसमेंट: स्पाईन सर्जरी • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्बुलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.)
Physician & Anasthhetist

डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.)
Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25



दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

RNI No. MAHMAR/2007/24252

तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28



अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २५०। किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | शुक्रवार १६/१०/२०२६ । पाने- ६



सेवा समिती आरोग्याची सेवा कधी करणार?

वर्षपूर्ती जवळ आली, तरी साधी फवारणी नाही | डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुनियाच्या पेशंटने हॉस्पिटल हाऊसफुल्ल

संगमनेर । प्रतिनिधी

संगमनेरकरांनी मोठ्या अपेक्षेने संगमनेर सेवा समितीच्या हाती नगरपरिषदेची सत्ता सोपवली. नगराध्यक्षपदासह नगरसेवकांच्या ३० पैकी तब्बल २७ जागांवर विजय मिळवत समितीने शहराच्या राजकारणात निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले. मात्र, या ऐतिहासिक विजयाच्या जवळपास दहा महिन्यांनंतरही शहरातील सार्वजनिक आरोग्याच्या प्रश्नावर अपेक्षित कार्यवाही होत आहे का, असा गंभीर सवाल आता उपस्थित होत आहे.

डेंग्यू, चिकुनगुनिया आणि मलेरियासारख्या साथीच्या आजारांची भीती असताना डास नियंत्रणासाठी आवश्यक फवारणी होत नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. मग नागरिकांच्या आरोग्याची जबाबदारी नेमकी कोणाची? संगमनेर शहरासह परिसरातील ग्रामीण भागात डेंग्यू, चिकुनगुनिया आणि मलेरियासारख्या आजारांच्या रुग्णांबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. डासांची उत्पत्ती रोखणे, आवश्यक त्या ठिकाणी कीटकनाशक फवारणी करणे, साचलेल्या पाण्याची तपासणी करणे आणि नागरिकांमध्ये जनजागृती करणे, त्याचबरोबरच रस्त्यावरची धूळ रोखणे या उपाययोजना अशा परिस्थितीत महत्त्वाच्या ठरतात.

मात्र, संबंधित भागांमध्ये फवारणी होत नसल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे. प्रत्यक्षात कोणत्या भागात किती रुग्ण आढळले, नगरपरिषदेने



किती ठिकाणी पाहणी केली आणि किती ठिकाणी फवारणी केली, याची अधिकृत माहिती नागरिकांसमोर येणे आवश्यक आहे.

फवारणीच्या निविदेचे कारण; मग नागरिकांनी काय करायचे?

आरोग्य विभागाशी संपर्क साधला असता, फवारणीसाठीची निविदा (टेंडर) नूतनीकरण न झाल्यामुळे अडचण निर्माण झाल्याचे सांगितले जात असल्याची माहिती नागरिकांकडून मिळते.

निविदा प्रक्रिया प्रलंबित असेल, तर त्यामागील कारण काय? नवीन निविदा कधी काढली जाणार? तोपर्यंत डास नियंत्रणासाठी पर्यायी व्यवस्था का करण्यात येत नाही? आणि जबाबदार विभागाने यासाठी कोणती कालमर्यादा निश्चित केली आहे? असे अनेक प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

निविदा प्रक्रिया ही प्रशासकीय बाब आहे; मात्र सार्वजनिक आरोग्याची जबाबदारी ही नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित बाब आहे. दोन्हींची गल्लत करून नागरिकांना अनिश्चित काळ वाट पाहायला लावणे योग्य ठरणार नाही.

सत्ता मिळवली; आता जबाबदारीचे काय?

डिसेंबर २०२५ मधील नगरपरिषद निवडणुकीत संगमनेर सेवा समितीने मोठे यश मिळवले. नगराध्यक्ष डॉ. मैथिली तांबे यांच्या नेतृत्वाखाली शहराच्या विकासाच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. निवडणुकीत मिळालेला कौल हा केवळ राजकीय विजय नसून नागरिकांनी दाखवलेला विश्वासही आहे.

मग या विश्वासाचे प्रतिबिंब नागरिकांच्या मूलभूत सुविधांमध्ये दिसायला नको का? रस्ते, पाणीपुरवठा आणि शहर सुशोभीकरण यांच्याइतकेच आरोग्य, स्वच्छता आणि रोगप्रतिबंधक उपाययोजनांना प्राधान्य मिळायला नको का?

नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाच्या स्वच्छता, वैद्यक व सार्वजनिक आरोग्य समितीच्या सभापतीपदी किशोर टोकसे यांची निवड झाल्याचे २० जानेवारी २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या वृत्तात नमूद आहे. त्यामुळे संबंधित समितीने फवारणी, रोगप्रतिबंधक उपाययोजना आणि नागरिकांच्या तक्रारी यांचा आढावा घेऊन ठोस कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

फवारणीसाठी निविदा नूतनीकरण झालेले नसेल, तर ती प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याची जबाबदारी कोणाची? तोपर्यंत तात्पुरती व्यवस्था करण्याचे अधिकार कोणाकडे आहेत? नागरिकांच्या तक्रारींचे प्रत्यक्ष निराकरण करण्यासाठी कोणते अधिकारी जबाबदार आहेत? हे प्रश्न केवळ विरोधासाठी उपस्थित केलेले नाहीत. डासांमुळे पसरणाऱ्या आजारांचा धोका कमी करणे, नागरिकांना वेळेवर माहिती देणे आणि सार्वजनिक आरोग्याच्या उपाययोजना नियमितपणे राबवणे, ही स्थानिक प्रशासनाची महत्त्वाची कामे आहेत. संगमनेरकरांना आता आश्वासनांपेक्षा प्रत्यक्ष कृती हवी आहे. तक्रारींच्या संदेशांपेक्षा प्रत्यक्ष फवारणी हवी आहे. निविदेच्या कारणांपेक्षा आजारांचा धोका कमी करणारी व्यवस्था हवी आहे. नगराध्यक्ष, आरोग्य समितीचे सभापती आणि मुख्याधिकारी यांनी या प्रश्नात लक्ष घालून फवारणीचे वेळापत्रक, प्रलंबित निविदेची स्थिती आणि आतापर्यंत केलेल्या कार्यवाहीची माहिती सार्वजनिक करावी, ही नागरिकांची अपेक्षा आहे. संगमनेर सेवा समिती आरोग्याची सेवा कधी करणार? नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आणखी किती काळ वाट पाहावी लागणार? असा आरोप विरोधकच नाही तर सर्वसामान्य नागरिक विचारत आहेत.

तक्रारींचे निराकरण फक्त व्हॉट्सअॅपवरील संदेशापुरते?

नगरपरिषदेच्या ग्राहक सेवा क्रमांकावर संपर्क साधून तक्रार नोंदवली जाते. मात्र, तक्रारीनंतर प्रत्यक्ष कार्यवाही झाल्याचा अनुभव येत नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. उलट, व्हॉट्सपवर 'प्रॉब्लेम रिझॉल्व्ह झाला' असा संदेश येतो; परंतु प्रत्यक्ष समस्या मात्र कायम असल्याचे सांगितले जाते. तक्रार नोंदवणे, तिचे निराकरण करणे आणि संबंधित नागरिकाला प्रत्यक्ष कार्यवाहीची माहिती देणे, या तीन स्वतंत्र बाबी आहेत. केवळ तक्रार निकाली काढल्याचा संदेश पाठवून नागरिकांच्या प्रश्नांचे निराकरण होत असेल, तर प्रत्यक्ष परिस्थिती वेगळी का दिसते, याचे उत्तर प्रशासनाने द्यायला हवे.











